भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2019 ◐ WE 541684

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक / दिनांक

नाझिया शब्बीर खतिब

उधळे बु

मुद्रांक शुल्क रक्कम 100/-

9322 | 22/12/2020

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

उप कोषागार अधिकारी खेड

23 DEC 2020

उप कोषागार अधिकारी खेड

सौ. शितल सुरेंद्र चिखले
मु. वि. प. क्र. ५/९२, मुद्रांक विक्रेता,
मु. पो. ता. खेड, जि. रत्ना.

Rs.5 INDIA FIVE RUPEES COURT FEE भारत पाँच रुपए

# प्रतिज्ञापत्र

## खेड, 31/12/२०२०

मा. कार्यकारी दंडाधिकारी सो।, खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी यांचे समोर-

मी खाली सही करणार श्रीम. नाझिया शब्बीर खतिब, वय ३३ वर्षे, धंदा- नोकरी, रा. मोहल्ला, उधळे बुद्रुक, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र ४१५६४० सत्य प्रतिज्ञेवर सांगते की,

१) मी ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता. खेड, जि. रत्नागिरी या संस्थेचा सभासद असून (मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १८) अन्वये सदर संस्था नोंदणी करणेसाठी सहाय्यक धर्मादाय आयुक्त रत्नागिरी विभाग रत्नागिरी यांचे कार्यालयात दि. / /२०२० रोजी प्रस्ताव दाखल करावयाचा आहे. सदर संस्थेच्या ज्ञापनातील नियम व नियमावलीतील तसेच प्रस्तावाबाबत जोडलेले इतर कागदपत्रांतील मजकूर व विधान बरोबर व सत्य आहेत.

Scanned with CamScanner

वरील संस्था ही धर्मादाय स्वरुपाचे उद्देशाकरीता स्थापन केली असून तिचे ध्येय व उद्देश मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलमाप्रमाणे आहेत.

मी असेही सांगते की,

१) या संस्थेचे विधानपत्रावर (संस्थापन समयालेख) सह्या करणाऱ्या सर्व सभासदांना मी ओळखते.

२) आज तारखेपर्यंत नोंदणी प्रकरणातील मजकूरात काहीही बदल झालेला नाही.

३) वरील नावाची किंवा नामसदृश्य असलेली संस्था/मंडळ माझ्या माहितीप्रमाणे आमच्या गावी अस्तित्वात वा नोंद झालेली नाही.

४) आज तारखेपर्यंत संस्थेस कोणत्याही प्रकारची स्थावर/जंगम मालमत्ता नाही. त्यास निधी म्हणून रोख रुपये ५,५००/- असून ती खजिनदार यांचेकडे जमा आहे.

५) या संस्थेच्या ज्ञापनात संस्थेच्या कार्यालयात पत्ता किंवा संस्थेच्या पत्रव्यवहाराचा पत्ता अध्यक्ष ॲल्युमिनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता. खेड, जि. रत्नागिरी द्वारा श्री. शब्बीर अहंमद खतीब, घर नं. ३०१, रा. मु.पो. उधळे बु. ता. खेड, जि. रत्नागिरी यांच्या मालकीची आहे. याबाबतीत काही कमी जास्त झाल्यास अथवा काही वाद निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझी स्वतःची तसेच इतर पदाधिकारी यांची राहील. संस्थेच्या पत्त्यात काही बदल झाल्यास तो रितसर आपल्याकडे कळविण्याची जबाबदारी माझी राहील.

या प्रतिज्ञापत्रातील कथन व माहिती सत्य व बरोबर आहे. असत्य आढळलेस भारतीय कलम १९३(२), १९९, २०० अन्वये कायदेशीर कारवाईस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

आज दि. रोजी प्रतिज्ञापत्र केले.

स्थळ - खेड

दिनांक- 31/12/2020



प्रतिज्ञापत्र करणारे माझे पूर्ण परिचयाचे आहेत.

सही-

(Signature) Watkar

सौ. उमा महेश वरवाटकर
मु. पो. भरणे
ता. खेड जि. रत्नागिरी

(Signature) Watkar

(श्रीम. नाझिया शब्बीर खतिब)
आधार कार्ड क्रं. ५३५२४२६४६५२८

No. MAG / SETU / SR / KHED / 15683 /20 20
Date - 31/12/2020
Solemnly affirmed before me by
Shri/Sm. N. S. Khatib
Who is identified to me by
Shri. U. Watkar
Whom I know personally,

Executive Magistrate,
Khed (Ratnagiri)

EXECUTIVE MAGISTRATE KHED कार्यकारी दंडाधिकारी

# ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भरणे, ता. खेड, जि. रत्नागिरी

कार्यालय पत्ता – श्री. शब्बीर अहमंद खतीब,
घर नं. ३०१, मु. पो. उधळे बु, ता. खेड, जि. रत्नागिरी

जाव. क्र. AATBK/02/2020 ता. 31.12.2020

## सभा नोटीस

ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्याय भरणे, ता. खेड, जि. रत्नागिरी या संस्थेची पहिली सभा दि. ०५/१२/२०२० रोजी वेळ दुपारी ४ वा. तु. बा. कदम महाविद्यालयाच्या आवारात आयोजित केली आहे तरी आपण या सभेला उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय –**

१. अध्यक्षांची निवड करणे.
२. संस्था स्थापन करण्याबाबत विचार विनिमय करणे.
३. संस्थेची घटना, नियात व नियमावली मंजूर करणे.
४. पहिल्या कार्यकारी मंडळाची निवड करणे व कार्यकाळ ठरविणे.
५. संस्था नोंदणी विषयक कागदपत्रे सादर करणे व त्यामध्ये आवश्यक असल्यास बदल करणे नोंदणी प्रमाणपत्र घेणे वगैरे अधिकार प्रदान करणे.
६. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणारे विषय.

Badhan

सचिव.
श्री. प्रविण रामचंद्र कदम

Scanned with CamScanner

# अॅल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भरणे, ता. खेड, जि. रत्नागिरी


कार्यालय पत्ता – श्री. शब्बीर अहमंद खतीब,
घर नं. ३०१, मु. पो. उधळे बु, ता. खेड, जि. रत्नागिरी


जाव. क्र. AATBK/01/2020 ता. 31.12.2020

अॅल्युमनी असोसिएशन ~~असोसिएशन~~ ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय या संस्थेच्या दि. ०५/१२/२०२० रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतील संस्था स्थापन करुन नोंदणी करण्याबाबत करण्यात आलेल्या ठरावाची सत्यपत.

## ठराव क्र. ३

ठराव करण्यात येतो की, तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या आजी, माजी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्या अनुषंगाने सामाजिक कार्य करण्यासाठी अॅल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भरणे, ता. खेड, जि. रत्नागिरी या नावाने संस्था स्थापन करुन ती मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणी करण्यात यावी.

सुचक – श्री. सुशील सुधीर कदम अनुमोदक – श्री. प्रशांत आत्माराम कदम

~~सचिव~~/अध्यक्ष

(नाझीया शब्बीर खतीब)

Scanned with CamScanner

नमुना नं. १० ची

बुक नं. ०३

# कराबद्दल पावती

नं. : 014

ग्रामपंचायत : उधळे बु।। तालुका खेड

रा. रा शब्बीर अहमद खतीब यांजकडून

घर नं.३०९ बिल नं. यांजबद्दल

सन २०१९।२० सालाकरिता नमुद केलेल्या रकमा कराबद्दल मिळाल्या.

| कराचे नांव | वसुल केलेल्या रकमा | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मागील फी | | चालु कर | | एकूण रक्कम | |
| | रुपये | पैसे | रुपये | पैसे | रुपये | पैसे |
| घरपट्टी | — | | ७१० | — | ७१० | — |
| ज. सॅने. पट्टी | | | | | | |
| लाईट कर | | | | | | |
| पाणी पट्टी | | | | | | |
| कर | | | | | | |
| कर | | | | | | |
| कर | — | | ७१० | - | ७१० | — |

एकूण .......

एकूण रक्कम रुपये सातशे दहा रु. मात्र पैसे पोहोचले

तारीख-२०/२/२०२० वसुल करणार (ग्रामसेवक)

ग्रामपंचायत

True Copy

Principal

Tukaram Baburao Kadam College Of Arts, Science & Commerce Bharne Tal.Khed, Dist.Ratnagiri.

Scanned with CamScanner

# सार्वजनिक न्यासाच्या नोंदणीसाठीचा अर्जाचा नमुना

## परिशिष्ट - २

(नियम ६ पहा)

प्रति,

सहाय्यक धर्मादाय आयुक्त

रत्नागिरी विभाग, रत्नागिरी

**"ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता.खेड, जि.रत्नागिरी"** ह्या सार्वजनिक न्यासासंबंधी.

मी **श्रीम.नाझिया शब्बीर खतिब, पद - अध्यक्ष** उपरिनिर्दिष्ट सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त सदरहू सार्वजनिक न्यासाच्या नोंदणीसाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम १८ अन्वये अर्ज सादर करीत आहे.

आम्ही पुढील आवश्यक तपशील सादर करीत आहे :-

(अ१) सार्वजनिक न्यास (Public Trus **"ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला,**
ज्या नांवाने ओळखला जातो **विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता.खेड, जि.रत्नागिरी"**
किंवा ओळखला जावा ते नांव :

(१) विश्वस्त व व्यवस्थापक यांची नांवे व पत्ते :-

| अ.क्र. | नांव | पत्ता | हुद्दा | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाझिया शब्बीर खतिब | मोहल्ला, उधळे बुद्रुक, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र -४१५६४० | अध्यक्ष | ३२ | भारतीय | नोकरी |
| २ | शुभम फिलिप्स केसकर | महात्मा फुले नगर, खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र -४१५७०९ | उपाध्यक्ष | २२ | भारतीय | वार्ताहर |
| ३ | प्रविण रामचंद्र जाधव | वलवण, मेट शिंदी, सातारा, शिंदी, महाराष्ट्र - ४१५७१५ | सरचिटणीस | २६ | भारतीय | नोकरी |
| ४ | विजय शंकर म्हादे | घर क्र. १०८ अ, म्हादे वाडी, ता. खेड, हेदली, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र-४१५७०९ | चिटणीस | ४२ | भारतीय | नोकरी |
| ५ | सुरज संजय जाधव | ब्राम्हण वाडी, ता. खेड, वेरळ, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र-४१५६२१ | खजिनदार | २३ | भारतीय | व्यवसाय |
| ६ | अक्षय श्रीकांत फाकडे | तलारी वाडी, गुणदे, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५७२२ | सदस्य | २२ | भारतीय | व्यवसाय |
| ७ | सुशिल सुधीर कदम | ८२७ अ, देवसडे (कदमवाडी), ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र -४१५७०९ | सदस्य | २४ | भारतीय | व्यवसाय |
| ८ | अश्विनी दिलीप चाळके | कीव वाडी, ता. खेड, सुकिवली, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५६२१ | सदस्य | ३२ | भारतीय | वकील |
| ९ | अनुजा अनिल कदम | ८६२, खडक वाडी, ता. खेड, वेरळ, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५६२१ | सदस्य | २२ | भारतीय | व्यवसाय |
| १० | प्रशांत आत्माराम कदम | धामनदेवी, दहिवली, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५७०९ | सदस्य | २९ | भारतीय | व्यवसाय |
| ११ | जयकांत चंद्रकांत कदम | गावडे वाडी, शिव बुद्रुक, खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५७०९ | सदस्य | २९ | भारतीय | वाहनचालक |



Scanned with CamScanner

(२) विश्वस्तांच्या किंवा व्यवस्थापक कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ पाच वर्षांचा राहील. कार्यकारी मंडळाची निवड यांचे जागी दुसरा विश्वस्त किंव दर पाच वर्षांनी फक्त मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बहुमताने करण्यात व्यवस्थापक येण्याची रीत येईल. कार्यकारी मंडळातील मयत, राजीनामा अगर अन्य कोणत्याही कारणाने कार्यकारी मंडळातील एखादे पद रिक्त झालेस कार्यकारी मंडळातील राहिलेले अन्य सदस्य ते पद आपल्या सभेत बहुमताने भरून घेऊ शकतील.

| | |
|---|---|
| (३) न्यासाचा हेतू | सोबत ज्ञापनाची प्रत जोडली आहे |
| (४) (अ) सार्वजनिक न्यास निर्माण करणाऱ्या दस्तऐवजांचा तपशिल (नकला जोडा) | |
| (ब) सार्वजनिक न्यासाचा उगम किंवा निर्मिती संबंधीचा दस्तऐव-जांचा इतर तपशिल. | सोबत मेमोरंडम ऑफ असोसिउशनची प्रत आहे. |
| (५) सार्वजनिक न्यासासंबंधी योजना कोणतीही असल्यास तिचा तपशिल (नकला जोडा) | सोबत नियमावलीची प्रत जोडली आहे. |
| (६) जंगम मिळकत अशा मिळकतीच्या प्रत्येक वर्गाच्या अंदाजे किंमतीसह (टिप:-प्रत्येक वस्तुचे वनज करण्याऐवजी अशा माल मिळकतीच्या वर्गाचे स्थूल वर्णन करून नोंदी भराव्या जसे फर्निचर पुस्तके वगैरे रोकड रक्कम न्यासाच्या भांडवलाचा भाग असेल तसेच फक्त रोकड रक्कमेसंबंधी नोंद करावी.) रोख्याच्या बाबतीत प्रत्येक रोखे कर्जरोखे (Securities) संचय (Stock), शेअर, ऋणपत्र (Debenture) यांचा त्यांच्या नंबरासह तपशील द्यावा. | या न्यासाचे खजिनदार यांचेजवळ रोख रू.५,५००/- जमा. |



Scanned with CamScanner

(७) (अ) जेथे स्थावर मालमत्ता असेल ते गाव किंवा नगर भूमापन, महा/नगरपालिका किंवा भूमापन क्रमांक,क्षेत्र,आकार किंवा जुडी दर्शविणारी स्थावर मालमत्तेची सविस्तर माहिती व ज्या अधिकाराने ती धारण केली असेल त्या धारणा अधिकाराचे वर्णन (हक्काचे पत्रक नगर भूमापन अभिलेख (City Survey Record) किंवा म्यूनिसिपल अभिलेख (Record) यातील मालमिळकती संबंधीच्या नोंदीच्या प्रमाणित प्रती जोडाव्या)

१. -- काही नाही --

२. -- काही नाही --

३. -- काही नाही --

(ब) प्रत्येक स्थावर मालमत्तेची अंदाजे किंमत — १. -- काही नाही --

(८) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या उत्पन्नाची साधने :- वर्गणी, देणगी, सभासद वर्गणी यांचेपासून मिळणारे उत्पन्न इ.

(९) सरासरी ठोस वार्षिक उत्पन्न :- संस्था नविन असल्याने वार्षिक ठोस उत्पन्न देता येत नाही.

(१०) सरासरी वार्षिक खर्च :- ----"----

११) सरासरी वार्षिक खर्चाची रककम :- ----"----

(अ) विश्वस्त व व्यवस्थापक यांचे मानधनावर/ पगारावर होणारा खर्च — सदरची संस्था नवीन असल्याने निश्चित आकडेवारी देता येत नाही.

(ब) आस्थापना व नोकरवर्ग यांवर होणारा खर्च

(क) धार्मिक हेतूप्रीत्यर्थ होणारा खर्च

(ड) धर्मादाय हेतूप्रीत्यर्थ होणारा खर्च

(ई) किरकोळ बाबीप्रीत्यर्थ होणारा खर्च

(१२) न्यासाच्या मालमिळकतीवरील बोजे कोणतेही असल्यास त्याचा तपशिल :- -- काही नाही --

(१३) न्यासाच्या मालमिळकतीसंबंधातील मालकी हक्काच्या दस्तऐवजांचा तपशील व ते ताब्यात असणाऱ्या विश्वस्तांची नांवे :- -- काही नाही -

१) स्थापना दिनांक :- / /२०२०

२) संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर राहील, तसेच

३) फी दाखल रक्कम रूपये -----------/- (अक्षरी रू.-------------------------) सोबत पाठवित आहे



Scanned with CamScanner

४) सार्वजनिक न्यासबंधी विश्वस्तांशी किंवा व्यवस्थापक यांच्याशी करावयाचा कोणताही पत्रव्यवहार पुढील पत्त्यावर करावा -

संस्थेचे पुर्ण नांव :- **"ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता.खेड, जि.रत्नागिरी"**

**संस्थेचा पत्ता :- द्वारा. श्री. शब्बीर अहंमद खतीब, घर नं. ३०१, रा. मु.पो. उधळे बु।।, ता.खेड,जि.रत्नागिरी.**

**व संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक :- ८००७१३९८८३**

तारीख माहे ...................... सन २०

सही ........................................

**(अध्यक्ष / अर्जदार)**

श्रीम. नाझिया शब्बीर खतिब

मी उपरिनिर्दिष्ट **श्रीम.नाझिया शब्बीर खतिब (अध्यक्षा)** ,राहणार - मोहल्ला, उधळे बुद्रुक, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र ४१५६४०, प्रतिज्ञापूर्वक इकरार करतो व सांगतो की, वरील अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या उत्तम माहिती प्रमाणे व समजूतीप्रमाणे खरी आहे.

रत्नागिरी येथे प्रतिज्ञापूर्वक इकरार केला.

आज तारीख माहे सन २०

(सही) ........................................

**(अध्यक्षा/ अर्जदार)**

संस्थेचे/मंडळाचे नांव :- **"ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता.खेड, जि.रत्नागिरी"**

**माझ्या समक्ष**

प्रो. विनोद नामदेव साळुंखे

मु. पोस्ट, भरणे. ता. खेड. जि. रत्नागिरी

Scanned with CamScanner

# परिशिष्ट "अ"

प्रति,

मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त

रत्नागिरी विभाग, रत्नागिरी.

**विषय** :-संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी होणेबाबत
**"ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता.खेड, जि.रत्नागिरी"**

महोदय,

निवेदन करणेत येते की, विषयांत नमूद केलेल्या संस्थेची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे करावयाची आहे. सबब आपणांकडे खालीलप्रमाणे कागदपत्र सादर करण्यात येत आहेत.

१) विधानपत्र (ज्ञापन) (मेमोरेंण्ड्म ऑफ असोसिएशन)
२) नियम व नियमावलीची सत्यप्रत. (आर्टीकल्स् ऑफ असोसिएशन)
३) संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाचे सर्व सभासदांचे संमत्तीपत्र.
४) संस्था नोंदणी बाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांचे सहीनिशी अधिकारपत्र.
५) संस्थेच्या पत्त्याबाबत व मालमत्तेबाबत अध्यक्ष वा सेक्रेटरी यांचे प्रतिज्ञापत्र १००/- च्या स्टॅम्पपेपरवर रू.५/- च्या कोर्ट फी स्टॅम्प सह.
६) अनुसूची एक (नियम ७)
७) अनुसूची दोन (नियम ८)
८) अनुसूची सहा (नियम १५)
९) संमत्तीपत्र (१९५०)
१०) संस्थेच्या स्थापनेबाबतच्या ठरावाची सत्यप्रत.
११) हमी पत्र
१२) प्रथम कार्यकारिणीची यादी
१३) संस्थेच्या पत्त्याबाबत जागा मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र.
१४) सर्व सभासदांचे ओळखपत्र व पत्त्याचा पुरावा

पुढे अशी विनंती करण्यात येते की, वरील संस्थेचे सर्व उद्देश सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम २० अन्वये असून वरील संस्थेच्या नावाची वा नामसद्द्दृश्य असलेली संस्था माझे माहिती प्रमाणे अस्तित्वात नाही. नोंदणी शुल्क रू. ५०/-(रूपये पन्नास फक्त) भरण्यास तयार आहे. तरी वरील संस्था - संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

कळावे.

आपली,

(श्रीम. नाझिया शब्बीर खतिब)
**अध्यक्ष**

Scanned with CamScanner

# -: परिशिष्ट "ब" :-

## ज्ञापन
## (मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन)

१) संस्थेचे नांव :- "ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता.खेड, जि.रत्नागिरी"

२) संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता :- अध्यक्ष, "ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता.खेड, जि.रत्नागिरी" द्वारा श्री. शब्बीर अहंमद खतीब, घर नं. ३०१, रा.मु.पो. उधळे बु।।, ता.खेड,जि. रत्नागिरी

३) संस्थेचे उद्दिष्ट्ये :-

(१) तु. बा. कदम महाविद्यालया मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना एकत्रीत करणे व त्यांच्यामध्ये बंधुभाव, प्रेम, एकता निर्माण करणे.

(२) महाविद्यालयात प्रवेश घेणारे व नव्याने उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यांना मार्गर्शन करणे, व त्यांना आवश्यक ती शैक्षणीक मदत पुरविणे.

(३) शैणिक व सामाजिक कार्यातून महाविद्यालयातील विद्यार्थी व उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण करणे, तसेच परिसंवाद घडवून आणणे.

(४) विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात महाविद्यालयातील विद्यार्थी व उत्तीर्ण विद्यार्थी यांच्या मदतीने प्रगती साधणे व शक्य असल्यास शैक्षणिक मदत पुरविण्याचा प्रयत्न करणे.

(५) महाविद्यालयातील उत्तीर्ण होणाऱ्या विद्यर्थ्यांच्या मदतीने महाविद्यालयामध्ये चर्चासत्रे, मेळावे, संमेलने आयोजित करणे व आवश्यक मार्गदर्शन करणे.

(६) आर्थिक दृष्ट्या गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य करण्याचा प्रयत्न करणे व त्यासाठी अभ्यासिका व पुस्तकांची व्यवस्था करणे.

(७) महाविद्यालयातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या मदतीने महाविद्यालयासाठी आवश्यक लागणारी साधनसामुग्री मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

(८) गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या आर्थिक मदत, वह्या, पुस्तके व युनिफॉर्म इत्यादि प्रकारचे सहाय्य करणे.

(९) गुणी विद्यार्थी तसेंच विविध क्षेत्रा मध्ये उल्लेखनिय कार्य केलेल्या व्यक्तींचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहनात्मक बक्षीसे वगैरे देणे.

(१०) महिलांसाठी शिवणकला व गृहउद्योग प्रशिक्षण केंद्र सुरु करून त्यात जीवनोपयोगी वस्तु तयार करण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करणे.

(११) गरीब रूग्णांना आवश्यक ती मदत करणे तसेंच गरीब व गरजू लोकांसाठी रूग्णवाहिका, रक्तपेढी वगैरे प्रकारच्या वैद्यकिय सुविधा निर्माण करून चालविणे किंवा चालविणेस मदत करणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सरचिटणीस

Scanned with CamScanner

(१२) कृषी व अन्य व्यवसाया विषयक तंत्रज्ञानाची व संशोधनाची माहिती मिळवून ती सर्व संबंधीतांना उपलब्ध करून देणेचा प्रयत्न करणे.

(१३) युवक व युवतींसाठी शैक्षणिक, क्रिडा, गायन व सांस्कृतीक स्पर्धांचे आयोजन करून त्यांच्या कलागुणांना उत्तेजन देणेचा प्रयत्न करणे.

(१४) बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी उद्योग केंद्र, के.व्ही. आय. सी.,नाबार्ड, आय.टी.सी., आय.डी. बी. व तत्सम संस्थाकडून सहाय्य घेऊन प्रकल्प राबविणेसाठी आवश्यक ते मार्गर्शन करणे. यात्रा, महोत्सव, मेळावे साजरे करणे.

(१५) व्यवसायिक कला कौशल्य शिक्षण सर्व स्तरांतील तरूण तरूणींना उपलब्ध होणेसाठी विविध कला कौशल्य प्रशिक्षण वर्ग सुरु करून चालविणे किंवा चालविणेस मदत करणे.

(१६) रक्त गटाची तपासणी करून त्याची अद्ययावत सूची तयार करणे व गरजे प्रमाणे संबंधीतांसाठी उपयोग करणे.

(१७) सुदृढ नागरीक बनविण्यासाठी तालीम खाने व व्यायाम शाळा करून त्यात विविध प्रकारचे योगासन व शारिरीक बाबींचे / खेळांचे प्रशिक्षण देणे.

(१८) क्रिकेट, कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, फूटबॉल, हॉकी, टेबल टेनिस, कॅरम वगैरे विविध खेळांचे प्रशिक्षण केंद्र सुरू करून युवा युवतींचे क्रिडा संघ तयार करून इतर ठिकाणी होणाऱ्या क्रिडा स्पर्धा मध्ये भाग घेणे तसेच विविध प्रकारच्या क्रिडा व अन्य स्पर्धा आयोजित करून त्या कार्यान्वीत करणे.

(१९) रचनात्मक उपक्रम (उदा. युवक कल्याण, बाल कल्याण, सामाजिक कल्याण, महिला सबळीकरण इ. सेवा कार्य वगैरे) हाती घेऊन ते कार्यान्वीत करणे.

(२०) नैसर्गिक व अनैसर्गिक आपत्तीत सापडलेल्यांना तसेंच गरीब व होतकरू रूग्णांना आवश्यक ती मदत करणे.

(२१) अनाथ व विधवा स्त्रियांना तसेंच त्यांच्या मुलांना आवश्यक ती मदत करणे.

(२२) दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी शासनाच्या विविध योजना व प्रकल्प राबविणेबाबत मार्गदर्शन करणे.

(२३) दिव्यांग, मतिमंद मुलांच्या शिक्षणाचे व पुनर्वसनाची सोय करणे तसेंच अंध व कर्णबधीर मुलांच्या शिक्षणाची सोय करणेचा प्रयत्न करणे. किंवा शिक्षणासाठी शाळा चालविणे.

(२४) विद्यार्थी व पालक यांचे मेळावे घेऊन विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी व शिक्षणा बाबत उदासिनता दूर करणेचा प्रयत्न करणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सरचिटणीस

Scanned with CamScanner

टिप :- वरील उद्देश राबविताना आवश्यक त्या ठिकाणी संबंधित खात्याची पुर्वपरवानगी घेण्यात येईल.

४. या संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये **"ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता.खेड, जि.रत्नागिरी"** या संस्थेचे नियम व नियमावलीप्रमाणे पहिल्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यात आली आहे, अशा कार्यकारी मंडळातील सभासदांची संपूर्ण नांव, पत्ते, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संपुर्ण नांव | पत्ता | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाझिया शब्बीर खतिब | मोहल्ला, उधळे बुद्रुक, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र -४१५६४० | अध्यक्ष | ३२ | नोकरी | भारतीय |
| २ | शुभम फिलिप्स केसकर | महात्मा फुले नगर, खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र -४१५७०९ | उपाध्यक्ष | २२ | वार्ताहर | भारतीय |
| ३ | प्रविण रामचंद्र जाधव | वलवण, मेट शिंदी, सातारा, शिंदी, महाराष्ट्र - ४१५७१५ | सरचिटणीस | २६ | नोकरी | भारतीय |
| ४ | विजय शंकर म्हादे | घर क्र. १०८ अ, म्हादे वाडी, ता. खेड, हेदली, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र-४१५७०९ | चिटणीस | ४२ | नोकरी | भारतीय |
| ५ | सुरज संजय जाधव | ब्राम्हण वाडी, ता. खेड, वेरळ, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र-४१५६२१ | खजिनदार | २३ | व्यवसाय | भारतीय |
| ६ | अक्षय श्रीकांत फाकडे | तलारी वाडी, गुणदे, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५७२२ | सदस्य | २२ | व्यवसाय | भारतीय |
| ७ | सुशिल सुधीर कदम | ८२७ अ, देवसडे (कदमवाडी), ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र -४१५७०९ | सदस्य | २४ | व्यवसाय | भारतीय |
| ८ | अश्विनी दिलीप चाळके | कीव वाडी, ता. खेड, सुकिवली, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५६२१ | सदस्य | ३२ | वकील | भारतीय |
| ९ | अनुजा अनिल कदम | ८६२, खडक वाडी, ता. खेड, वेरळ, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५६२१ | सदस्य | २२ | व्यवसाय | भारतीय |
| १० | प्रशांत आत्माराम कदम | धामनदेवी, दहिवली, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५७०९ | सदस्य | २९ | व्यवसाय | भारतीय |
| ११ | जयकांत चंद्रकांत कदम | गावडे वाडी, शिव ब्रुद्रुक, खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५७०९ | सदस्य | २९ | वाहनचालक | भारतीय |

अध्यक्ष     उपाध्यक्ष     सरचिटणीस

Scanned with CamScanner

५. आम्ही खालील सह्या करणार **"ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता.खेड, जि.रत्नागिरी"** या संस्थेचे कार्यकारी सभासद जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन ही संस्था दिनांक / /२०२० रोजी स्थापन केली असून सदरच्या नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंद होणेसाठी आम्ही या विधानपत्रावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

| अ.क्र. | संपुर्ण नांव | पत्ता | सही |
|---|---|---|---|
| १ | नाझिया शब्बीर खतिब | मोहल्ला, उधळे बुद्रुक, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र -४१५६४० | |
| २ | शुभम फिलिप्स केसकर | महात्मा फुले नगर, खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र -४१५७०९ | |
| ३ | प्रविण रामचंद्र जाधव | वलवण, मेट शिंदी, सातारा, शिंदी, महाराष्ट्र - ४१५७१५ | |
| ४ | विजय शंकर म्हादे | घर क्र. १०८ अ, म्हादे वाडी, ता. खेड, हेदली, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र-४१५७०९ | |
| ५ | सुरज संजय जाधव | ब्राम्हण वाडी, ता. खेड, वेरळ, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र-४१५६२१ | |
| ६ | अक्षय श्रीकांत फाकडे | तलारी वाडी, गुणदे, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५७२२ | |
| ७ | सुशिल सुधीर कदम | ८२७ अ, देवसडे (कदमवाडी), ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र -४१५७०९ | |
| ८ | अश्विनी दिलीप चाळके | कीव वाडी, ता. खेड, सुकिवली, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५६२१ | |
| ९ | अनुजा अनिल कदम | ८६२, खडक वाडी, ता. खेड, वेरळ, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५६२१ | |
| १० | प्रशांत आत्माराम कदम | धामनदेवी, दहिवली, ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५७०९ | |
| ११ | जयकांत चंद्रकांत कदम | गावडे वाडी, शिव ब्रुद्रुक, खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५७०९ | |

वरील सह्या करणाऱ्या इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

Adv. Tukaram Laxman Dafle
B. A LL B.
2rd Floor, Near Tahasildar Office
KHED, Tal. Khed, Dist. Rtg

स्थळ :- खेड

दिनांक

(विशेष कार्यकारी अधिकारी / वकील / सनदी लेखापाल / नोटरी यांचे संपूर्ण नांव, पत्ता व शिक्का)

अध्यक्ष उपाध्यक्ष सरचिटणीस

# -: परिशिष्ट "क" :-

## "ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता.खेड, जि.रत्नागिरी" या संस्थेची नियम आणि नियमावली (मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन).

**१) नियमावलीतील संदर्भीय शब्दाची व्याख्या :-**

१. संस्था म्हणजे **"ॲल्युमनी असोसिएशन ऑफ तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भरणे, ता.खेड, जि.रत्नागिरी"**

**२) उद्देश व ध्येये :-**

१. ज्ञापनातील कलम ३ मध्ये नमूद केलेले सर्व उद्देश.

२. अनुसूचि - सन १९७१ च्या संस्था नोंदणी महाराष्ट्राचे नियमाप्रमाणे सोबत जोडलेल्या अनुसूची १, २ व ६.

३. सभासद - नियम व नियमावलीप्रमाणे प्रवेश दिलेला, सदस्यत्वाची वर्गणी भरलेली व सदस्यत्वाच्या पदावर सही केलेली व्यक्ती.

४. संस्था नोंदणी अधिनियम - सन १८६० चा भारत सरकारचा कायदा व त्याखाली येणारे नियम.

५. कार्यकारी मंडळ - मंडळाच्या नियम व नियमावलीप्रमाणे संस्थेच्या व्यवस्थापनासाठी नेमलेले विश्वस्त, कार्यकारी मंडळ, व गर्व्हनिंग कौंसिल.

**२) संस्थेचे कार्यक्षेत्र :-**

संस्थेचे कार्यक्षेत्र हे महाराष्ट्र राज्य राहील.

**३) हिशोबाचे वर्षे :-**

संस्थेचे हिशोबाचे वर्ष ०१ एप्रिल ते ३१ मार्च असे राहिल.

**४) सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत :-**

१. संस्थेचे ध्येय, उद्देश व नियमावली मान्य असणाऱ्या १८(अठरा) वर्षावरील भारतीय व्यक्तीस सदर संस्थेचा सभासद होता येईल.

२. सभासद होण्यासाठी विहीत नमुन्यात ठेवलेला अर्ज संस्थेच्या सचिवाकडे कार्यकारी मंडळातील दोन सदस्यांची शिफारस जोडून करावयाचा आहे. सर्व प्रकारच्या सभासदांस प्रवेश फी रू. २५/- भरावी लागेल.

**५) सभासदांचे प्रकार :-**

**अ) आजिव सभासद :-**

संस्थेला रूपये २५०/-मात्र देणाऱ्या व्यक्तीस आजीव सभासद म्हणून समजण्यात येईल.

**ब) साधारण सभासद :-**

संस्थेला रूपये १००/- मात्र देणाऱ्या व्यक्तीस साधारण सभासद म्हणून समजण्यात येईल.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सरचिटणीस

Scanned with CamScanner

क) **संस्थापक सभासद :-**

हया संस्थेच्या संस्था स्थापनेच्या वेळेचे सर्व सभासद हे संस्थेचे संस्थापक सभासद राहतील.

६) **सभासदत्व रद्द होणेबाबत :-**

१. सभासद निधन पावल्यास.

२. सभसदाने राजीनामा दिल्यास व तो मंजूर झाल्यास.

३. सभासदाने फौजदारी वा नैतिक अध:पतनाच्या गुन्हयाखाली शिक्षा झाल्यास अथवा संस्थेच्या हिताविरूध्द कृत्य केल्यास.

४. एका वर्षापेक्षा जास्त वर्गणी कालावधीतील वर्गणी थकीत राहिल्यास कार्यकारी मंडळ सदर सभासदास योग्य सुचना देऊन वर्गणी न भरल्यास सभासदत्व रद्द केले जाईल.

७) **सर्वसाधारण सभा व तिचे अधिकार आणि कार्ये :-**

१. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यापासून चार महिन्यात झाली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत सभा चार महिन्यात न झाल्यास संस्थेचे २/३ सभासद सर्वसाधारण सभा घेऊ शकतील व अशा सभेतील ठराव मंडळावर बंधनकारक असतील.

२. मागील सभेचा वृत्तांत, कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमाखर्च, अंदाजपत्रक मंजूर करणे.

३. कार्यकारी मंडळाची निवड करणे.

४. पुढील वर्षासाठी हिशोब तपासणीस नेमणे व त्याची फी ठरविणे. संस्थेच्या नियम व नियमावलीतील दुरूस्तीस मान्यता देणे.

५. ध्येय धोरणांबाबत चर्चा करणे.

६. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

८) **सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :-**

१. कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या दिवशी, वेळी, ठिकाणी सभा होईल.

२. वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस अध्यक्षांच्या संम्मतीने मंडळाच्या सचिवांच्या सहीने काढण्यात येईल. वार्षिक सभेची नोटीस १५ दिवस अगोदर संस्थेच्या सर्व सभासदांना दिली पाहिजे.

३. एखाद्या सभासदास अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टीगने पाठविलेली नोटीस जर त्याला मिळाली नाही तर, त्यामुळे सदर सभेतील कामकाजास त्याची बाधा येणार नाही.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सरचिटणीस

Scanned with CamScanner

४. सभेची नोटीस वर्तमानपत्रातून प्रसिध्द केलेस उत्तम पण बंधनकारक नाही.

५. सभेचा कोरम एकूण सभासद संख्येच्या २/३ एवढा राहील. कोरम अभावी तहकूब झालेली सभा लगेच एका तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येईल व त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही. पण नोटीसीमध्ये तशी सूचना लिहिणे आवश्यक आहे. सभेस निमंत्रितांना अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने हजर राहता येईल पण त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही.

**९) विशेष सर्वसाधारण सभा व तिचे काम :-**

कार्यकारी मंडळास एखादी विशेष महत्वाची गोष्ट संस्थेच्या सर्व सभासदांच्या समोर ठेवणेची असेल किंवा २/३ (दोन तृतीयांश) सभासदाने लेखी मागणी केल्यास विशेष सर्वसाधारण सभा घेणेत येईल व त्यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम पाळले जातील.

**१०) संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकाऱ्यांची रचना :-**

संस्थेचे कार्यकारी मंडळात कमीत कमी ११ व जास्तीत जास्त २७ सभासद असू शकतील. प्रथम अध्यक्ष - १, उपाध्यक्ष - १, सरचिटणीस - १, चिटणीस - १, खजिनदार -१, सदस्य - ६ हे पदाधिकारी व उरलेले कार्यकारी मंडळाचे संचालक असतील.

**११) कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणूकीची पध्दत :-**

कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ ५ वर्षाचा राहील. कार्यकारी मंडळाची निवड दर ५ वर्षांनी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बहुमताने करण्यात येईल. कार्यकारी मंडळातील सर्व सभासदांची यादी सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम ४ व सन १९८१ च्या संस्था नोंदणी नियम महाराष्ट्राचे कलम ७ अन्वये अनुसूची १ मध्ये मे. सहाय्यक संस्था निबंधक, रत्नागिरी विभाग रत्नागिरी यांचेकडे दरवर्षी न चुकता पाठविण्यात येईल.

**१२) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-**

**अध्यक्ष :-**

१. संस्थेच्या सर्व सभांचे अध्यक्ष स्थान स्विकारत नि:पक्षीपातीपणे सभा पार पाडणे.
२. समान मत विभागणी झाल्यास एक जादा निर्णायक मत देणे.
३. संस्थेच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
४. संस्थेच्या कागदपत्रांवर सहया करणे.

**उपाध्यक्ष :-**

अध्यक्षांच्या गैरहजेरीत अध्यक्षांची सर्व कामे ज्येष्ठतेनुसार पार पाडणे व इतर वेळी त्यांच्या कामात मदत करणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सरचिटणीस

Scanned with CamScanner

**सरचिटणीस :-**

१. संस्थेच्या सर्व सभांचा वृत्तांत लिहून ठेवणे.
२. अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज पहाणे.
३. संस्थेच्या ध्येय धोरणांप्रमाणे कामकाज पहाणे.
४. संस्थेचा पत्रव्यवहार सांभाळणे.
५. आर्थिक व्यवहाराची सर्वस्वी जबाबदारी सचिवांवर राहील.
६. कार्यालयीन सेवक नेमणे, कमी करणे, वगैरेबाबत सचिवाने कार्यकारीणीकडे योजना सादर करावयाची आहे.
७. प्रशिक्षणाच्या योजना आखणे, तत्संबंधी माहिती गोळा करणे व ती योजना संस्थेने मान्य केल्यावर तिची कार्यवाही करणे.
८. अध्यक्ष व सल्लागार यांच्या गैरहजेरीत त्यांची कामे पहाणे.

**चिटणीस :-**

सरचिटणीसंच्या कार्यात मदत करणे व सरचिटणीसांच्या गैरहजेरीत सर्व काम पार पाडणे.

**खजिनदार :-**

१. संस्थेचे हिशोब ठेवणे व त्यासंबंधी /त्यासाठी सर्व कागदपत्रे तयार ठेवणे.
२. वर्गणी, देणग्या स्विकारणे पावत्या देणे.
३. जमाखर्च तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे व हिशोब वेळोवेळी तपासून घेणे. तसेच दरवर्षी मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रत्नागिरी यांचेकडे हिशोबपत्रके सादर करणे.
४. जमाखर्च सर्वसाधारण सभेपूढे मांडणे, सचिवांना त्यांच्या कामात मदत करणे.

**कार्यकारी मंडळाचे सभासद :-**

१. पदाधिकाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामात मदत करणे, कार्यकारी मंडळाच्या सभेला व वार्षिक सर्वसाधारण सभेला हजर राहून मतदान करणे.

**१३) कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :-**

